# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## राज्य सेवा पूर्व परीक्षा - २०१७

**क्रमांक : एडीव्ही ३११७/सीआर-८४/२०१६/तीन** **जाहिरात क्रमांक : ५७/२०१६**

खालील तक्त्यामधील पदांच्या भरतीकरीता आयोगामार्फत **राज्य सेवा पूर्व परीक्षा २०१७, रविवार, दिनांक २ एप्रिल, २०१७ रोजी महाराष्ट्रातील ३७ जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल.**

**२.** प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**३. उपलब्ध पदसंख्या :- एकूण १५५ पदे**

| **(१) सहायक विक्रीकर आयुक्त, गट-अ (एकूण ४१ पदे)** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **एकूण मागासवर्गीय** | **खुला** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | ७+२* | ६+१* | -- | १ | -- | -- | ३ | २ | २२ | १९ | ४१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ६ | ५ | -- | १ | -- | -- | २ | २ | १६ | १२ | २८ |
| महिला | ३ | २ | -- | -- | -- | -- | १ | -- | ६ | ६ | १२ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| विकलांग | एकूण पद १ - श्रवणशक्तीतील दोष - १ पद | | | | | | | | | | |
| **(२) उप मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी, गट-अ (एकूण ४ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | २ | ४ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | २ | ४ |
| **(३) अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-अ, (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(४) तहसिलदार, गट-अ (एकूण २५ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ३ | १ | १ | १ | १ | -- | ४ | १ | १२ | १३ | २५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | १ | १ | -- | १ | -- | ३ | १ | ९ | ८ | १७ |
| महिला | १ | -- | -- | १ | -- | -- | १ | -- | ३ | ४ | ७ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| एकूण पद १ - चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू - १ पद | | | | | | | | | | | |
| **(५) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब (एकूण ३ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | १* | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ |
| **(६) कक्ष अधिकारी, गट-ब (एकूण १५ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | -- | -- | १ | -- | -- | ४ | -- | ७ | ८ | १५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | -- | १ | -- | -- | ३ | -- | ५ | ६ | ११ |
| महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | २ | २ | ४ |
| विकलांग | एकूण पद १ - श्रवणशक्तीतील दोष - १ पद | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(७) सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (एकूण १६ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | २ | २ | -- | -- | -- | २ | -- | ८ | ८ | १६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | २ | २ | -- | -- | -- | २ | -- | ८ | ६ | १४ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| विकलांग | एकूण पदे २ - चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू - २ पदे | | | | | | | | | | |
| **(८) सहायक निबंधक सहकारी संस्था, गट-ब (एकूण १४ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | ३ | १ | -- | -- | -- | २ | -- | ७ | ७ | १४ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | २ | १ | -- | -- | -- | २ | -- | ६ | ५ | ११ |
| महिला | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ |
| विकलांग | एकूण पदे ३ - अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - १ पद, श्रवणशक्तीतील दोष - १ पद, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू - १ पद, | | | | | | | | | | |
| **(९) उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गट-ब (एकूण २ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(१०) उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- ब (एकूण २ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| **(११) सहायक आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, गट-ब (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(१२) नायब तहसिलदार, गट-ब (एकूण ३१ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ३ | ४ | १ | -- | -- | -- | १ | २ | ११ | २० | ३१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | ३ | १ | -- | -- | -- | १ | २ | ९ | १२ | २१ |
| महिला | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ७ | ९ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| *** अनुशेषाचे पद** | | | | | | | | | | | |

**३.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**३.२** उपरोक्त पदांव्यतिरिक्त उपजिल्हाधिकारी, गट-अ, सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक, गट-अ, उपशिक्षणाधिकारी, गट-ब इत्यादी पदांचा तसेच विद्यमान संवर्गाव्यतिरिक्त काही नवीन संवर्गातील पदांचा समावेश होण्याची शक्यता आहे. संबंधित विभागाकडून विहित कालावधित सुधारित/अतिरिक्त मागणीपत्र प्राप्त झाल्यास, त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेत करण्यात येईल.

**३.३** महिलांसाठीचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३.४** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अ.जा. व अ.ज. वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**३.५** वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**३.६** प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**३.७** प्राविण्य पात्र खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे ते ज्या संवर्गासाठी अर्ज करीत आहेत, त्याकरीता विहित दर्जाची असल्याबाबत अर्ज सादर करताच सक्षम प्राधिका-याकडून खातरजमा करुन घ्यावी. तरच त्यांना पात्र खेळाडू आरक्षणाचा लाभ घेता येईल.

**३.८** प्राविण्य पात्र खेळाडूंसाठी आरक्षित पदाकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे मुलाखतीस आमंत्रित केल्यानंतर प्रस्तुत पदांच्या मुलाखतीपूर्वी संचालक, क्रीडा व युवक संचालनालय, पुणे किंवा सक्षम प्राधिकारी यांच्याकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

**३.९** संचालक, क्रीडा किंवा सक्षम प्राधिका-याकडे प्रमाणपत्रे सादर करताना पात्र खेळाडू उमेदवाराने आपली खेळाडू विषयक **सर्व प्रमाणपत्रे एकाच वेळी** सादर करणे आवश्यक आहे.

**३.१०** प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या पदांच्या बाबतीत खालील पदांसमोर दर्शविलेल्या शारीरिक पात्रतेचे निकष धारण करणारे उमेदवारच त्या त्या पदावर नियुक्तीसाठी पात्र अथवा अपात्र असतील :-

| अ.क्र. | पदाचे नांव | शासन आदेश | विकलांगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | सहायक विक्रीकर आयुक्त, गट-अ | शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-१०१२/प्र.क्र.२१३/वि.प्र.-४<br>दिनांक ११ मार्च, २०१६ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| २ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी, गट-अ | शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक मविसे १०/२०१०/ प्र.क्र.३६६/ आस्था-३, दिनांक १४ जानेवारी, २०११ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ३ | सहायक गट विकास अधिकारी, गट-ब | | |
| ४ | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक इएसटी ४०९८/सीआर १५४/इएक्ससी-४,<br>दिनांक १६ फेब्रुवारी, २००९ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - अपात्र |
| ५ | उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट ब | | (२) श्रवणशक्तीतील दोष - अपात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - अपात्र |
| ६ | सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक इएसटी ४०९८/सीआर १५४/इएक्ससी-४,<br>दिनांक १६ फेब्रुवारी, २००९ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ७ | तहसिलदार, गट-अ | शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक संकिर्ण-१०९८/प्र.क्र.१४/ई-१<br>दिनांक २६ सप्टेंबर, २००० | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ८ | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एमईडी १२०३/प्र.क्र.३७२/परि-४,<br>दिनांक ८ ऑगस्ट, २००८ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ९ | कक्ष अधिकारी, गट-ब | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक कअस-१३१५/प्र.क्र.१२०/१४ब<br>दिनांक १६ एप्रिल, २०१६ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| १० | सहायक निबंधक, सहकारी संस्था, गट-ब | शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, क्रमांक अपंग-२०११/ प्र.क्र.१७७/सुधार-३,<br>दिनांक १५ ऑक्टोबर, २०११ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ११ | उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गट-ब | शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक स ११/२००४/प्र.क्र.१४६/ई-६<br>दिनांक ९ जुलै, २००८ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| १२ | नायब तहसिलदार, गट-ब | शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण १०९८/प्र.क्र.२१८/ई-९<br>दिनांक ११ जुलै, २००८ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |

**३.११** इतर पदांच्या बाबतीत विकलांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३.१२** विकलांगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**३.१३** विकलांगासाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता विकलांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

**३.१४** विकलांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ मधील आदेशानुसार SADM या नविन संगणक प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**३.१५** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**३.१६** परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा, शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

**३.१७** विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत यासंदर्भात संबंधित उमेदवाराने आयोगास स्वतंत्रपणे पत्राद्वारे विनंती करणे आवश्यक आहे.

**३.१८** कक्ष अधिकारी गट-ब हे पद वगळता इतर पदांकरिता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" लागू आहेत.

**४. वेतनश्रेणी/वेतनबँड :-**

**४.१** गट -अ च्या पदांकरिता रूपये १५,६००-३९,१०० व नियमांनुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**४.२** गट-ब च्या पदांकरिता रूपये ९,३००-३४,८०० व नियमांनुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**५. पात्रता :-**

**५.१** भारतीय नागरिकत्व.

**५.२ वयोमर्यादा :-**

**५.२.१ दिनांक १ एप्रिल, २०१७** रोजी वय किमान १९ वर्षे असावे व कमाल ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**५.२.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.
(२) प्राविण्य पात्र खेळाडूंच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.
(३) माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यत शिथिलक्षम.
(४) विकलांग उमेदवारांच्या बाबतीत वयाच्या ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.
(५) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**५.३ अर्हता :-**

५.३.१ उपलब्ध पदसंख्येतील सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी , गट-ब हे पद वगळून इतर पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

५.३.२ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब पदाकरिता अभियांत्रिकी किंवा भौतिक शास्त्र व गणित विषयासह विज्ञान शाखेतील पदवी.

५.३.३ पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत परीक्षेस पात्र असतील, परंतु राज्य सेवा मुख्य परीक्षा- २०१७ च्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१७ करिता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५.३.४ अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यन्त पूर्ण केली असली पाहिजे.

५.३.५ सर्व पदांसाठी मराठीचे ज्ञान आवश्यक राहील.

५.३.६ उपरोक्त अर्हतेव्यतिरिक्त काही पदांच्या बाबतीत शारीरिक मोजमापे/विशिष्ट शैक्षणिक अर्हता आवश्यक असून अशा अर्हतेबाबतच्या सविस्तर तरतुदी मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येतील.

**६. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

**६.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**६.१.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

**६.१.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**६.१.३** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**६.२** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टीआरएन-०५१४/प्र.क्र.७/१४/१८-ब, दिनांक २४ एप्रिल, २०१५ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार परिवीक्षाधीन नियुक्तीवर रुजू होणा-या उमेदवारांस ठराविक रकमेचे बंधपत्र (Bond) देणे आवश्यक राहील.

**६.३** महाराष्ट्र नागरी सेवा (महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या राज्य नागरी सेवा परीक्षेद्वारे गट-"अ" आणि गट-"ब" (राजपत्रित), या पदाकरीता निवड होऊन सरळसेवेने नियुक्त होणा-या व एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण घेणा-या उमेदवारांची सेवा ज्येष्ठता निश्चित करणे) नियम, २०१५ नुसार, निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित संवर्गातील परस्पर सेवा ज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

**७. परीक्षेचे टप्पे - तीन**

**७.१** प्रस्तुत परीक्षा खालील तीन टप्प्यामध्ये घेण्यात येईल :-

| | | |
|---|---|---|
| (१) पूर्व परीक्षा गुण | - | ४०० |
| (२) मुख्य परीक्षा गुण | - | ८०० |
| (३) मुलाखत गुण | - | १०० |
| एकूण गुण | - | १३०० |

**७.२** उमेदवारांनी मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचेवेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.

**८. शुल्क : ८.१** :- अमागास - **रु. ५२३/-** **८.२** :- मागासवर्गीय - **रु. ३२३/-**

**९. अर्ज करण्याची पद्धत :-**

**९.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**९.२** पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक १४ डिसेंबर, २०१६ ते ३ जानेवारी, २०१७** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**९.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**९.४** आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

**९.५** आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

**९.६** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**९.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

**९.७.१** शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील **'माझे खाते'** या लिंक वर क्लिक करावे.

**९.७.२** **'माझे खाते'** या लिंक वर क्लिक केल्यानंतर **'माझे अप्लिकेशन'** सदरातील **'स्पर्धात्मक परीक्षा'**या लिंक वर क्लिक करावे.

**९.७.३** **'स्पर्धात्मक परीक्षा'** या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. **'Unpaid'** लिहिलेल्या पद/परीक्षेसमोर **' Pay Now'** अशी लिंक उपलब्ध असेल.

**९.७.४** **'Pay Now '** या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

**९.७.५** क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

**९.७.६** नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

**९.७.७** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

**९.७.८** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**९.७.९** विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ३ जानेवारी, २०१७** रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**९.७.१०** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ४ जानेवारी, २०१७** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**९.७.११** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**९.८ केंद्र निवड :-**

**९.८.१** परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता "माझे खाते" मधील संबंधित परीक्षेची निवड करावी. त्यानंतर "केंद्र निवडा" या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. केंद्राच्या क्षमतेइतक्या अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

**९.८.२** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुटटी अथवा रविवारचा असेल, तर सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करता येईल.

**९.८.३** वरीलप्रमाणे केंद्र निवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हा केंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हा केंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**९.८.४** केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**१०. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**१०.१** प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१०.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१०.३** परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

११. **परीक्षेस प्रवेश**

**११.१ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशप्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.**

**११.२** डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator) इत्यादी प्रकारची साधने / साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

**११.३** आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**१२.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षा**" विभागातील ' **राज्य सेवा परीक्षा**' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**१३.** प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१४.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : १४ डिसेंबर, २०१६

सु. ह. अवताडे
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.